MHKO100001202026

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ०५/२०२६ मधील नि. क्र. १ वरील आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (VIII) १८२७ कलम २ अन्वये वारसा प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदार यांचे असे कथन आहे की, यातील अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र.२ ते ३ यांचे वडील तसेच अर्जदार क्र.४ यांचा मुलगा शिवाजी तुकाराम बुरूड हा दि.१८.०६.२०२४ रोजी आकस्मीतरित्या मयत झाला आहे. अर्जदार हे मयत शिवाजी तुकाराम बुरूड यांचे वर्ग १ कायदेशीर व सरळ वारस आहेत. वर नमुद अर्जदारांव्यतिरिक्त मयत शिवाजी यास दुसरे सरळ वारस नाहीत. मयत शिवाजी तुकाराम बुरूड हे मृत्युसमयी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडे वाहक म्हणून एप्रिल २०११ पासून चंदगड आगार येथे कार्यरत होते. मयत शिवाजी तुकाराम बुरूड सेवा बजावत असताना दि.१८.०६.२०२४ रोजी आकस्किमतरित्या मयत झालेला आहे.

३. मयत शिवाजी तुकाराम बुरूड हे आकस्मितरित्या मयत झालेमुळे अर्जदार क्रमांक १ ते ४ यांचा घरचा चरितार्थ चालविणे व मुलांचे शिक्षण करणे मुश्किल झाले आहे. कारण घरातील मिळविता एकमेव व्यक्ती मयत शिवाजी हाच होता. त्यामुळे अर्जदार क्रमांक १ हिने मयताची पत्नी या नात्याने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ कोल्हापूर विभागाकडे अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेकरिता अर्ज सादर केला. तेव्हा मे.विभाग नियंत्रक यांनी शिवाजी बुरूड यांचे कायदेशीर वारस असलेबाबतचा वारसा

दाखला योग्य त्या न्यायालयाचा हजर करा असे तोंडी व लेखी पत्राद्वारे सांगितले. त्यामुळे यातील अर्जदार क्र.१ ते ४ हे मयत शिवाजी तुकाराम बुरूड यांचे कायदेशीर सरळ वारस असलेबाबतचा वारसा दाखला मिळणेकरिता प्रस्तुतचा अर्ज मे.न्यायालयात दाखल करणे अर्जदारांना भाग पडलेले आहे.

**४.** मयत शिवाजी तुकाराम बुरूड यांचे मृत्यु पश्चात नोकरीतील मिळणारे प्रॉव्हीडंट फंड, ग्रच्युएटीची व इतर मिळणा—या रक्कमा मिळणेकरिता मयत शिवाजी याचे सरळ वारसदार म्हणून अर्जदार क्र.१ ते ४ यांनी मे. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,गडहिंग्लज यांचेकडे दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक १०/२५ चा दाखल केलेला होता. त्याचा निकाल दि.२०.०६.२०२५ रोजी होवून नियमाप्रमाणे मिळणारे सर्व आर्थिक लाभ न्यायालयाने दिलेल्या वारसा दाखला प्रमाणे अर्जदार क्र.१ ते ४ यांना मिळालेला आहे.

**५.** अर्जदार क्र.४ ही मयत शिवाजी तुकाराम बुरूड यांची आई आहे. त्या वयोवृध्द आहेत. त्यामुळे अनुकंपा तत्वावर अर्जदार क्रमांक १ हिस नोकरी मिळणेकरिता अर्जदार क्र.४ हिने संमती दिलेली आहे. त्याकरिता प्रस्तुत प्रकरणासोबत तिचे शपथपत्र हजर केलेले आहे. अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज कै.शिवाजी तुकाराम बुरूड याचे वारस असलेबाबतचे वारसा दाखला मिळणेसाठी दाखल केला असून यातील अर्जदार हे या अर्जाव्दारे मिळालेल्या वारसा दाखल्याचा उपयोग या अर्जात उल्लेख केले कारणाखेरीज इतर कोणत्याही कारणाकरिता करणार नाहीत.

**६.** अर्जदार क्र.१ ते ४ यांनी स्वत:चे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.५ वर सादर केले आहे. त्यांनी अर्जातील कथनांप्रमाणे प्रतिज्ञापत्रात कथने केलेली आहेत. तसेच कागदोपत्री पुरावा म्हणून मयत शिवाजी तुकारात बुरूड यांचे मृत्यूप्रमाणपत्र निशाणी क्र.१५ वर हजर केले आहे. तसेच अर्जदार क्र.१ ते ४ यांच्या आधारकार्डची छायांकित प्रत व मे.विभागीय कार्यालय ,महाराष्ट्र

राज्य परिवहन महामंडळ कोल्हापूर यांनी जा.क्र.७१८४ ने दिलेले पत्र ,दिवाणी न्यायालय व स्तर गडहिंग्लज यांचेकडील दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक १०/२५ मधील निकालाची प्रत दाखल केली आहे. अर्जदार क्र दृ १ यांनी त्यांचे सरतपासाचे शपथपत्र निशाणी क्र.१२ वर व अर्जदार क्र.२ यांनी निशाणी १३वर दाखल केले आहे. अर्जदार यांनी याकामी सदर अर्जाची जाहीर नोटीस 'केसरी' या वृत्तपत्रातील जाहीरनामा निशाणी क्र.९ वर दाखल केलेला आहे. तसेच अर्जदारतर्फे पुरावा बंद पुरशिस नि.क्र.१४ वर दाखल केलेली आहे.

७. वरील सर्व कथनांचा विचार करता व दाखल कागदपत्रांची पहाणी केली असता अर्जदार १ ते ४ हे मयत शिवाजी तुकाराम बुरूड यांचे कायदेशीर वारस असल्याचे दिसून येत आहे. तसेच जाहीरनामा प्रसिध्द करूनही अर्जातील कथनांस हरकत दर्शविणारी कोणतीही व्यक्ती न्यायालयासमक्ष हजर झालेली नाही. त्यामुळे अर्जातील कथने ही निर्विवाद राहिलेली आहेत.

८. उपरोक्त परिस्थितीनुसार व दाखल कागदपत्रानुसार अर्जदार हे मयत शिवाजी तुकाराम बुरूड यांचे कायदेशीर वारस असल्याचे दिसून येत आहे. परिणामत: ते वारसा प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळणेकरीता पात्र ठरले आहेत. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**१.** अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

**२.** अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत शिवाजी तुकाराम बुरूड यांचे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ मधील तरतुदीनुसार कायदेशिर वारस असल्याचे घोषित करण्यात येत आहे.

**३.** अर्जदार क्र. १ ते ४ यांचे नावे कायदेशिर वारसा प्रमाणपत्र

(Heirship Certificate) आवश्यक ते न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर जारी करण्यात यावे.

४. सदरचे वारसा प्रमाणपत्र हे अर्जात नमुद कारणासाठीच लागू राहील इतर कोणत्याही कारणाकरीता लागू राहणार नाही.

५. अर्जदार यांना त्यांचे नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात यावे व सिव्हील मॅन्युअल प्रकरण १४ मधील परिच्छेद क्र. ३१२ प्रमाणे मुळ वारसा प्रमाणपत्रावर टीप नमुद करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2026.04.01 15:30:23 +0530

ठिकाण — गडहिंग्लज.
दिनांक : २४/०३/२०२६

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
गडहिंग्लज.